Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

**Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648**

# Curren Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**Dec. 21 Issue- X Vol. II**

**Chief Editor**

**Mr. Arun B. Godam**

**Shaurya Publication , Latur**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Issue X (25) , Vol. II<br>Dec. 2021 | Peer Reviewed<br>SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# Index


1. Impactof Fruits And Vegetables In Covid-19 — 5
   Deepak Karan, Vishwa Nath and Ravi Karan
2. Discovery and Remote Access Tools & Services in Libraries — 9
   Devidas Eknathrao Dadpe
3. 'Effect of sugar mill effluent on water quality of Bore-well' — 14
   Dr. A. V. Gaikwad
4. Administration of Green audit in Vasant Mahavidyalaya ,Kaij [M.S.] — 16
   Hirve Babasaheb J.
5. Spirituality and Pandemic like Covid -19 — 20
   Sonia Uttam Bairagi
6. Importance of Mahatma Gandhiji's Views on Sanitation — 26
   Dr. Pandit Mahadeo Lawand
7. GST In India — 29
   Dr. Pratap J. Phalphale Ananda Ramrao Sarange
8. साठोत्तरी हिंदी महिला कहानीकार और स्त्री विमर्श — 32
   डॉ. शिवाजी एस. कदम
9. मनरेगाच्या अंमलबजावणीत ग्रामसभेची भूमिका — 35
   प्रा.सुनिल काशिराम राठोड , डॉ.व्ही.डी. गायकवाड
10. जॉन रॉल्सची 'न्यायाची संकल्पना' — 40
    डॉ. संजय मारोतीराव कोनाळे
11. मराठी भाषा आणि साहित्य — 44
    प्रा. गोरोबा शेषेराव रोडगे
12. ऐतिहासिक पर्यटन — 48
    डॉ. पाटील विनायक उध्दवराव
13. भारतीय कृषी क्षेत्रातील उत्पादन, उत्पादकता आणि उपलब्धता — 52
    डॉ. सोनवने एस. व्यंकटराव
14. दलित शब्द की उत्पत्ति एवं अर्थ — 57
    सहा. प्रा. डॉ. राजेश आरदवाड

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Issue X (25) , Vol. II<br>Dec. 2021 | Peer Reviewed<br>SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# मराठी भाषा आणि साहित्य

प्रा. गोरोबा शेषेराव रोडगे
मराठी विभाग प्रमुख, शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ,जि. लातूर

---

समाज जीवनात सामाजिक,राजकीय,आर्थिक,धार्मिक या विविध स्तरांवर सातत्याने परिवर्तन व स्थित्यंतरे घडत असतात, नवीन शासन येते, त्याबरोबर राज्यकर्त्या समाजाच्या भाषेचा प्रभाव वाढत जातो. स्थानिक व स्थलांतरीत लोकांमध्ये होणाऱ्या भाषिक देवाण घेवाणीतून अनेक नवे शब्द,म्हणी, वाक्यप्रयोग तयार होतात. जागतिकीकरण,औद्यागिकीकरण यामुळे समाजात नवनवीन तंत्रज्ञान विकसित होते, त्यामुळे नवनवीन शब्द भाषेत येत राहतात. भाषेच्या बदलांचा एका अर्थाने त्या भाषक समाजाच्या सामाजिक अंतस्तरात होत जाणाऱ्या बदलांचा इतिहास असतो. यावरून एखाद्या समाजाची खरीखुरी सांस्कृतिक ओळख माहिती करून घ्यायची असेल तर त्या समाजातील शोषणाचा किंवा वैभवाचा इतिहास जाणून घ्यावासा वाटत असेल तर भाषेइतके प्रभावी,विश्वासू साधन नाही. भाषा आणि समाज एकमेकांशी एका विशिष्ट नात्याने गुंफले गेलेले असतात.समाजात होणाऱ्या बदलांबरोबर भाषेतही बदल होत जातात. नवीन शब्दांची व्युत्पत्ती, जुन्या शब्दांचे संपुष्टात येणे हा त्याचाच एक भाग असतो.

आजही मराठी भाषेत वे शब्द मोठया प्रमाणावर तयार करण्याची गरज आहे. गेल्या काही शतकांत अध्यात्माच्या क्षेत्रात श्रीमंत असणारी मराठी आज एकविसाव्या शतकात हतबल अवस्थेत येऊन थांबली आहे.ती प्राणांतिक हाक घालते आहे. मला शब्द द्या.आजच्या आणि उद्याच्या जीवनाचा आशय व्यक्त करणारे शब्द. राज्यकारभारात,व्यापारात, कारखानदारीत,रीतिरिवाजात,ज्ञानात,विज्ञानात आणि विविध व्यवसायांत मला घेऊन जाणारे शब्द ! हे शब्दजीवन मला मिळाले नाही तर मी जागच्या जागी खुरटून जाईन, नामशेषही होईन. (YCM,MAR-102) यावरून आपल्या लक्षात येईल की, एवढी जुनी भाषा कशा संवदेना व्यक्त करत आहे.

सामाजिक जीवनात होणारे बदल भाषेत प्रतिबिंबित होत असतात.समाजात सातत्याने अभिसरणाची प्रक्रीया चालू असते.समाजातील वर्गव्यवस्था, व्यवसायीक प्रतिष्ठा, राजकीय, सामाजिक तत्वप्रणाली, विविध संप्रदाय, यांच्यात अभिसरण घडून येत असते.या अभिरसणामुळे त्या त्या अनुभवक्षेत्रांतील विशिष्ट शब्द दुसऱ्या क्षेत्रात वापरले जातात.त्याचवेळी त्या शब्दास नवा अर्थ प्राप्त होतो.अर्थाचे क्षेत्र विस्तारले जाते.आपण एकमेकांशी बोलतो.आपली दिनचर्या एकमेकांशी बोलण्यापासूनच सुरू होते.या एका वैशिष्टामुळे मानव प्राणी इतर सजीव सृष्टी पासून वेगळा झ ााला.आपण लहानपणी कोणती भाषा बोलावी हे आपल्या सभोवतालच्या समूहावर अवलंबून असते.आपल्या समूहाची जी भाषा तीच आपली भाषा होऊन जाते.पुढे शाळेत किंवा इतरत्र औपचारिक रीतीने इतर भाषा शिकल्या जातात.प्रवासातून शिकावयास मिळते. थोडक्यात भाषा हे लोकांशी संपर्क ठेवण्याचे .पण कळत नकळत या भाषेनेच आपले व्यक्तिमत्व घडत जात असते.प्रत्येक भाषिक समाजाची परंपरागत मूल्यव्यवस्था त्या त्या भाषेतून प्रतिबिंबित होत जाते.भाषा आणि मानवी मन एकच आहे असे जरी म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही.कारण मन हे भाषेतूनच व्यक्त होत असते.भाषेतून मानवी मनात मुरलेल मनातून नाकारायला फार प्रयत्न करावे लागतात.यामुळेच काही कवींनी भाषेला आई म्हटल आहे.संत ज्ञानेश्वरांनीही 'अमृताशी पैजा जिंके' माझी मराठी अस म्हटलंय ते उगीच नाही.

मराठी भाषेतला पहिला शिलालेख 2220 वर्षांपूर्वीचा म्हणजे इसवी सन सुरू होण्याच्या आधीचा आहे.तो ब्राम्ही लिपीत असून पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळच्या नाणेघाटात हा शिलालेख आहे. मराठीत आज उपलब्ध असलेला आणि दोन हजार वर्ष जुना असलेला ग्रंथ म्हणजे 'गाथासप्तशती' तर दुसऱ्या शतकातील वररूचीचे व्याकरण या ग्रंथात मराठी व्याकरणाचे नियम सांगितले आहेत. अडीच हजार वर्षांपूर्वीच्या 'विनयपिटक' या पाली भाषेतील धर्मग्रंथात 'महारठ्ठ' उल्लेल आलेला आहे.श्रीलंकेतील सिंहली भाषेतील 'दीपवंश' ग्रंथात 'महारठ्ठ', 'महाराष्ट' शब्द आहेत.यावरून आपणांस मराठी भाषेचे प्राचीनत्व लक्षात येते.थोडक्यात दुसऱ्या शतकात मराठी भाषा असल्याचे पुरावे आपणासं मिळतात.(म.सा.प एप्रिल 2018, डॉ.सुधीर देवरे)

भाषा आणि साहित्य यांचा अगदी जवळचा संबंध आहे. लेखक विचारवंत कितीही मोठा असला तरी त्याला प्रभावीपणे व्यक्त होण्यासाठी भाषेचा चातुर्याने वापर करावा लागतो. आपल्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाचे एक प्रधान अंग या दृष्टीने साहित्याकडे पाहिले जाते. प्रत्येक लेखकाची स्वत:ची काही वैशिष्टये असतात. लेखक प्रचलित व्यवस्थेच्या बाहेर जाऊ पाहतात.या व्यवस्थेच्या बाहेर जाऊन काहीतरी नवनिर्माण करतात.त्यालाच साहित्य असेही म्हटले जाते.वाचक त्या साहित्याचा आस्वाद घेतात.आपल्या प्रतिक्रीया देतात. आनंदाने त्याचा स्वीकार करतात. अर्थात लोकांनी स्वीकार करून वाचण्या इतपत दर्जेदार असायला भाषेचे उपयोजन तेवढेच दर्जेदार असावे लागते.भाषेवर प्रभुत्व मिळवणे सर्वच साहित्यिकांना, लेखकांना साध्य होते असे नाही.भाषेच्या आधारे लेखक आपले विचार, आपल्या भावना यांचे नवनवीन अविष्कार सिद्ध करत असतो.काही प्रसंगी तो आपल्याच भाषेत नाविन्यता आणतो तर काही वेळा दुसऱ्या भाषेतील शब्द स्व भाषेत चातुर्याने वापरतो.परिणामी आपली साहित्यकृती दर्जेदार बनवतो.थोडक्यात भाषेचा योग्य वापर करण्याचे कौशल्य त्या जवळ असावे लागते.मराठी साहित्यात फक्त मराठी भाषेतीलच नव्हे तर मराठीच्या बोलीभाषांची विविधता सुद्धा मराठी साहित्य समृद्ध करते.बोलीभाषांची विविधता हे मराठीचे खरे वैभव आहे, मराठीला 52 बोलीभाषा आहेत.या सर्वच बोलीभाषांतील साहित्य अतिशय उत्तम दर्जाचे आहे. याचे प्रमुख कारण या सर्व साहित्यात बोलीभाषेचा केलेला प्रभावी वापर. त्यात प्रामुख्याने वैदर्भी, कोकणी, अहिराणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी या काही प्रमुख बोलीभाषा होत.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्याच्या टप्प्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम आणि त्या निकषांपर्यंत घेऊन जाणारे साहित्य अभ्यासले तर गाथा सप्तशती, पादलिप्त, हरिभद्राची समरादित्याची कथा, उद्योतनसुरीची कुवलयमाला, चक्रधरांचे लिळाचरित्र, ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा, एकनाथांची भारूडे,माझा प्रवास, गावगाडा, धग, कोसला, बनगरवाडी, बॅरिस्टर अनिरूद्ध धोपेश्वरकर, गोलपिठा, शांतता कोर्ट चालू आहे यांसारख्या काही जुन्या नव्या ग्रंथांमध्ये मराठीची श्रेष्ठता दडली आहे. यांबरोबरच फुले-आंबेडकर-टिळक, आगरकर, राजारामशास्त्री भागवत, प्रबोधनकार ठाकरे यांचे वैचारिक लेखन उच्चतम प्रतिचे आहे.राजारामशास्त्री भागवतांच्या संशोधनाचा अहवाल मांडतांना लोकसाहित्याच्या अभ्यासक दुर्गा भागवत म्हणतात की, जुनी माहाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे हे त्यांनी आपल्या संशोधनातुन दाखवुन दिले आहे.मराठी ही भाषा संस्कृतोद्भव नाहीच. संस्कृतपेक्षा जुनी मराठी भाषा आहे.यावेळी दुर्गा भागवत मराठीला संस्कृतची मावशी म्हणतात.यावरून आपल्या मराठी साहित्यातील, संशोधनातील भाषचे उपयोजन लक्षात येते.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Issue X (25) , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| Dec. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139 |


मराठी साहित्य विश्वातील जेष्ठ साहित्यिक, त्यां नंतर बहिणाबाई, उद्वध शेळके, भुजंग मेश्राम, सदानंद देशमुख, रंगनाथ पठारे, व्यंकटेश माडगुळकर, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, राम नगरकर, राजन गवस, मच्छिंद्र कांबळी, प्र.ई.सोनकांबळी, बा.भ.बोरकर, नामदेव ढसाळ या साऱ्यांमुळेच मराठी साहित्य समृद्ध झाले आहे. दलित साहित्याने मराठी साहित्याला सामाजिक आधार देऊन भाषेचा प्रभावी वापर करून दर्जेदार साहित्य निर्मिती केली आहे.

भाषेतील साहित्य ती भाषा जे लोक मातृभाषा म्हणून वापरतात.त्यांच्या विचारांना, त्यांच्यातील गुणप्रवृत्तीला, त्यांच्यातील कल्पनाशक्तीला, आवाहन करण्याचे काम भाषा करत असते.साहित्यिक भाषेचा वापर चातुर्याने करतो म्हणून तर वाचकांस तो चांगल्या प्रकारची साहित्यकृती देऊ शकतो.साहित्याचा आस्वाद घेण्याची एक चांगली संधी उपलब्ध करून देऊ शकतो.साहित्य व्यक्तिच्या आयुष्यातील जीवनानुभवाचे दर्शन घडविते, मांगल्याचे दर्शन घडविते.वाचकांच्या उत्साहाला प्रोत्साहान देण्याचे काम उत्कुष्ठ साहित्यकृती करत असते.साहित्यात भाषेचा सोपेपणा किंवा साधेपणा आहे.ही एक सिद्धी आहे.भाषेद्वारे साहित्य समाजाशी रक्ताच्या नात्याने जोडले जाते.समाजातून व्यक्तिच्या व्यवहारातून निमार्ण होत असते. भाषा ही प्रभावी, प्रवाही असते, जसे ज्या नदीला जास्त ओढे,नाले येऊन मिळतात ती मोठी नदी समजले जाते, तसेच भाषेचेही आहे, ज्या भाषेच्या जांस्त बोलीभाषा ती मोठी, श्रीमंत भाषा, मराठी भाषेच्या 52 बोलीभाषा असल्याचे माझ्या शोधनिबंधात आले आहे, यावरून मराठी भाषेची श्रीमंती आपल्या लक्षात येते. भाषेच्या अभिधा, लक्षणा आणि व्यंजना या भाषेच्या शक्ती होत, या शक्ती साहित्यकृतीतून व्यक्त होत असल्याने त्यातून भावानुभव व्यक्त होत जातो. ललित साहित्यातून प्रतिभावंत मानवी मनाची अनुभूती, त्यातून व्यक्त होणारा अनुभव, अतिशय महत्वाचा असतो.साहित्यिकाचा अनुभव जितका प्रगल्भ तितकीच त्याची भाषा अर्थपूर्ण होत जाते.विचार करण्याची शक्ती पक्वता धारण करते. आशयाची लय आणि नादसौंदर्य साहित्यात एकजीव होऊन प्रकटते.

**सारांश :**

मानवी जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्याचे महत्वाचे काम भाषा करत असते.व्यक्तिच्या आयुष्याची जडणघडण करण्याचे महत्वपूर्ण काम भाषा करते. भाषा मानवी जीवनाला आकार देण्याचे काम करते म्हणून शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर अभ्यासक्रम तयार करीत असतांना, अभ्यासक्रमाचे स्वरूप ठरवितांना, अभ्यासक्रमाची व्याप्ती निश्चित करतांना, भाषा या घटकाचा प्रामुख्याने विचार केला जातो. विद्यार्थ्यांच्या वयाचा विचार करून भाषेचा स्तर ठरविला जातो.कारण अभ्यासक्रमाचे अध्यापन त्या विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेवर अवलंबून असते.विद्यार्थ्याला त्याच्या संस्कृतीची खरी ओळख भाषेतून होत असते.व्यक्तिच्या सामाजिकतेच्या कक्षा रुंदावण्याला भाषा शिक्षण इतके प्रभावी साधन नाही, विद्यार्थ्यांमध्ये भाषिक विविधता निर्माण होण्यासाठी भाषा शिक्षण महत्वाची भूमिका निभावत असते.प्राथमिक शिक्षण झ ाल्यांनतर सामाजिकतेच्या कक्षा रुंदावण्यासाठी साहित्य मदत करते.त्यामुळे वाचकाला गोडी निर्माण करण्याचे काम साहित्यातील भाषा करत असते. साहित्यकृतीची यशस्विता संपूर्णता: साहित्यकृतीत लेखकाने केलेल्या भाषिक उपयोजनावर अवलंबून असते. ज्या साहित्यिकाची भाषिक उपयोजन क्षमता चांगली त्यांची साहित्यिकृती दर्जेदार ठरते.

सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र शासनाने इयत्ता दहावी पर्यंतच्या कोणत्याही माध्यमातील शिक्षणात मराठी हा भाषा विषय सक्तीचा केला आहे.थोडक्यात व्यक्तिच्या वैचारिकतेच्या कक्षा रुंदावण्याचे महत्वपूर्ण काम भाषा शिक्षण करत असते. शिक्षण कोणत्याही माध्यमातील असले तरी त्या व्यक्तिच्या जीवनाला खऱ्या अर्थाने योग्य दिशा देण्याचे काम भाषा,साहित्य, संस्कृती करत असते.

संदर्भ :

1. कालेकर ना.गो.'भाषा आणि संस्कृती', मौज प्रकाशन, मुंबई 2012

2. केळकर अशोक, 'मध्यमा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे 1996

3. डहाके वसंत, 'कवितेविषयी', स्वरूप प्रकाशन, औरगांबाद, 1999

4. धोंगडे रमेश 'मराठी भाषा आणि शैली', दिलीपराज प्रकाशन, पुणे 1985

5. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', एप्रिल 2018

6. सराफ रा.सो. 'भाषा मातभाषा आणि परभाषा', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 2006

# Current Global Reviewer

ISSN 2319-8648

Peer Reviewed

ISSN 2319-8648

Impact Factor - 7.139

UGC Approved Journal
Sr. No. 64310



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in